## ध्वनी प्रदूषण तसेच अनधिकृत मंडपांबाबत तक्रारींसाठी महापालिकेची हेल्पलाईन


दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

वर्ष-४

अंक - ३२

epaper.diwanews.com

www.diwanews.com ♦ सोमवार,१० मार्च २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किंमत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


**ठाणे :-** उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, ठाणे महापालिका क्षेत्रातील ध्वनी प्रदूषण तसेच अनधिकृत किंवा अनियमित मंडप रचना यांच्याबाबत नागरिकांना तक्रार नोंदवता यावी यासाठी तक्रार निवारण प्रणाली तयार करण्यात आली आहे. *(पान ७ वाचा)*

# दिव्याला दिलासा मिळणार

## ठामपा अर्थसंकल्पात आरोग्याबरोबर पाणी व्यवस्थेवर केले लक्षकेंद्रित

**ठाणे:** दिवा नाम तो सुनाही होगा... अहो पण, हाच दिवा ठाणे महापालिकेच्या हद्दीतील एक शहर आहे. मूलभूत सोयीसुविधांपासून नेहमी वंचित राहिले अशी त्याची ओळख आहे. पण, यंदाच्या ठाणे महापालिका अर्थसंकल्पात ती ओळख पुसण्यासाठी प्रयत्न केला आहे. यामध्ये पाणी टंचाई दूर करण्याबरोबर शासकीय आरोग्य यंत्रणा उभारण्यावर भर दिला गेला आहे. नव्याने जलकुंभ बांधणे आणि जलवाहिनी टाकण्याचे काम हाती घेतले आहे. याचबरोबर रुग्णालयासाठी जागा भूसंपादनानंतर रुग्णालय बांधकामाचे नियोजन आहे. हे कामे मार्गी लागल्यास दिव्याखाली काही प्रमाणात अंधार दूर होईल असेच दिसत आहे. तर यंदाच्या



अर्थसंकल्पात या गोष्टींचा उल्लेख असल्याने ही एकप्रकारे आनंद वार्ता दिवावासीयांसाठी असल्याचे दिसत आहे.

ठामपा आयुक्त सौरभ राव यांनी अर्थसंकल्प सादर करताना, दिवावासीयांचा विचार केल्याचे दिसत आहे. दिव्याला भेडसावणारी पाणी समस्या आणि तेथील आरोग्य व्यवस्था सक्षम करण्याचा विचार करून त्याचे प्रयोजन केले आहे. यामध्ये दिवा रुग्णालयाकरीता जागा भुसंपादन करण्यासाठी ५८ कोटी शासन निधी प्राप्त झाल्याचे म्हटले आहे. तर जागा भूसंपादनाबाबतचा प्रस्ताव ही ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे. त्या जागा भूसंपादनानंतर रुग्णालय बांधकामाचे नियोजन असल्याचेही म्हटले. तर दिवावासीयांसाठी सर्वात महत्वाचे म्हणजे पाणी टंचाईतून सोडविण्यासाठी अंतर्गत वितरण व्यवस्था भर दिल्याचे दिसत आहे.

यामध्ये दिव्याबरोबर मुंब्रा या प्रभाग समिती अंतर्गत वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा (रिमॉडेलिंग) व नव्याने जलकुंभ बांधणेचे काम शासन निधीकडून २४० कोटी २९ लाखमधून हाती घेण्यात आल्याचे म्हटले. या प्रकल्पांतर्गत एकूण १२.५४१ कि.मी. लांबीची मुख्य जलवाहिनी टाकण्यात येणार आहे . ९९.१७२ कि.मी. लांबीची वितरण जलवाहिनी टाकण्याबरोबर जलकुंभ बांधण्याच्या कामाचा समावेश केला आहे. त्यापैकी एकूण ८.९३७ कि.मी. लांबीची मुख्य जलवाहिनी व ८४.७९१ कि.मी. लांबीची वितरण जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आल्याचा उल्लेख ही त्या अर्थसंकल्पात केला आहे. तसेच सद्यस्थितीतील जागा उपलब्धतेनुसार मुंब्रा व दिवा येथे तब्बल ७ जलकुंभाची जागा अंतिम झाल्याचे नमूद केले आहे. त्यापैकी कौसा, मुंब्रा येथे २ जलकुंभ बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत ५ जलकुंभांचे सविस्तर डिझाईनचे काम सुरु आहे. या प्रकल्पाची भौतीक प्रगती ८०ℨ आहे. याशिवाय हे प्रकल्प डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती आयुक्तांनी दिली. यामुळे दिवावासीयांचा काही प्रमाणात मूलभूत समस्यांचा वनवासातून सुटका होणार असेच दिसत आहे.

# काळू धरण पूर्ण करून ठाणे महानगराची पाणी समस्या कायमस्वरूपी निकाली काढणार



## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधानसभेत ग्वाही

**कळवा, मुंब्रा व दिवा परिसरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी प्रयत्न, काळू धरण पूर्ण होईपर्यंत पर्यायी उपाय योजनांचा अवलंब**

**ठाणे :-** ठाणे महानगरपालिका क्षेत्रात कळवा, मुंब्रा व दिवा परिसरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी राज्य शासन विविध प्रयत्न करीत आहे. काळू धरण पूर्ण होईपर्यंत पर्यायी उपाय योजनांचा अवलंब करून या समस्येवर मात करण्यात येईल. काळू धरण पूर्ण करण्यात येवून ठाणे महापालिका क्षेत्रातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

ठाणे महापालिका क्षेत्रातील मुंब्रा, कळवा परिसरातील पाणी टंचाई बाबत सदस्य जितेंद्र आव्हाड यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात अधिक माहिती देताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, ठाणे महापालिका क्षेत्रातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. ठाणे महापालिका व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मुंब्रा, कौसा व कळवा भागात प्रतिदिन १३०.५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो. पाणीपुरवठा पूर्ण दाबाने होण्यासाठी या भागात सहा जलकुंभांची निर्मिती करण्यात येत आहे. त्यामध्ये दोन जलकुंभ कार्यान्वित करण्यात आले असून उर्वरित चार जलकुंभ कार्यान्वित होण्यासाठी वितरण जलवाहिनी टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी रिमोल्डिंग प्रकल्प राबविण्यात येत आहे. यासाठी शासनाने नगरोत्थानमधून २४० कोटी रुपयांची तरतूदही केली आहे.

कळवा, मुंब्रा, दिवा भागासाठी ५० एम.एल.डी ते संपूर्ण ठाणे महानगर करिता १०० एम.एल.डी पाण्याच्या प्रस्ताव महापालिकेने दिला होता, त्यावर कार्यवाहीचे आदेश महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला दिले आहेत. तसेच एमआयडीसीच्या बारावी धरणातून महानगराला पाण्याची गरज भागवण्यासाठी अतिरिक्त ५० दशलक्ष लिटर पाणी मागणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे करण्यात आली आहे. एमआयडीसी विटावा भागात रात्री १२ ते ५ यावेळी पाणीपुरवठा बंद करते. या भागात पाणीटंचाई दूर करण्यासाठी अतिरिक्त जलवाहिनीचे काम सुरू आहे. हे काम पूर्ण होईपर्यंत रात्री १२ ते ५ या कालावधीत पाणीपुरवठा सुरू करण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात येईल. ठाणे महापालिकेच्या मुख्य जलवाहिनीवर अवैधरित्या नळ जोडण्या घेण्यात आल्या असतील, तर याबाबत तातडीने चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिला.

# लाडक्या बहिणींना वाढीव रक्कम देण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची महिला दिनी ग्वाही

**मुंबई :** लाडक्या बहिणींना वाढीव रक्कम देण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन आहे. त्यावर लवकरच निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. लाडकी बहीण योजना बंद करणार असे विरोधक म्हणत असले तरीही ही योजना कधीही बंद होणार नाही, असा पुनरुच्चार त्यांनी केला. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शिवसेना महिला आघाडीने आयोजित केलेल्या शिवदुर्गा सन्मान सोहळ्यात ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सरकार लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी देणार असे विचारणाऱ्यांनी निवडणुकीत ३००० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. पण मतदारांनी त्यांना घरी बसवले, अशी टीका शिंदे यांनी विरोधकांवर केली. खुर्चीच्या मोहापायी कोणतीही तडजोड करणार नाही. लाडकी बहिण योजनेत जी काही वाढ करायची आहे त्याचं नियोजन आमच्या डोक्यात आहे, योग्य वेळी योग्य होईल, असे शिंदे यांनी लाडक्या बहिणींना आश्वस्त केले. अडीच वर्षापूर्वी धनुष्यबाण गहाण ठेवायचे, शिवसेना दावणीला बांधण्याचे काम केलं म्हणून उठाव केला, असे ते म्हणाले. शिवसेनेने ८० जागा लढली आणि ६० जागा जिंकल्या यावरुन खरी शिवसेना कोणाची हे निवडणुकीत मतदारांनी दाखवून दिले. काहींना मग निवडणूक आयोगाने घोटाळा केला, इव्हीएमने घोटाळा केला अशी आवई उठवली, असा टोला त्यांनी उबाठाला लगावला. गेल्या ५० वर्षात नागरी समस्यांची जाण असणारा कोण तर एकनाथ शिंदे असे शरद पवार साहेब म्हणाले आणि त्यांनी त्यांच्या पुस्तकात कोणाबद्दल काय लिहून ठेवलं हे सुद्धा माहित आहे.

तत्पूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिंदुत्वाचा वारसा सांगणाऱ्या राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, त्यागमूर्ती रमाई आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले. ज्यांना लाडकी बहिण मानले त्या शिवदुर्गा असून त्यांना वंदन करायला आज लाडका भाऊ आला, अशी भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केली. ज्याच्या पाठिशी बहिणीची माया त्याचे जीवन नाही जात वाया, असे ते म्हणाले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ६० व्या वाढदिवसानिमित्त उपस्थित महिलांनी औक्षण केले. तसेच ज्येष्ठ महिलांकडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दृष्ट काढण्यात आली.

राज्यात महायुतीचे सरकार ऐतिहासिक विजय मिळवून सत्तेत आले. लोकसभेनंतर विरोधकांनी नव्या सरकारची तयारी सुरु केली होती. हॉटेल बुकिंग झाली होती, मात्र लाडक्या बहिणींनी त्यांचे बुकिंग रद्द केले, असा टोला शिंदे यांनी लगावला. महायुतीला मिळालेला विजय हा लाडक्या बहिणींचा विजय आहे, असे ते म्हणाले. राज्यात फिरत असताना मला, देवेंद्रजी आणि अजित दादांना राख्या बांधण्यासाठी लाडक्या बहिणींची गर्दी उसळायची. टेंभीनाक्याला रक्षा बंधनाला संपूर्ण हाताला राख्या बांधल्या जातात. ही आनंद दिघेंची परंपरा आहे, अशी आठवण त्यांनी यावेळी काढली. सत्ता येते जाते, पद येतील जातील पण लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ हे पद सर्व पदांपेक्षा मोठं आहे, अशी भावना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली.

# सातव्या वेतन आयोगातील फरक मिळवण्यासाठी होळीच्या दिवशी कामगार स्व दहन करणार

**ठाणे :-** देशात तसेच राज्यात सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. मात्र, ठाणे महानगर पालिकेकडून या वेतन आयोगाचा फरक कामगारांना देण्यात आलेला नाही. त्या निषेधार्थ महाराष्ट्र म्युनिसिपल कर्मचारी युनियनचे नेते , माजी कार्यकारी अभियंता रवींद्र शिंदे यांनी होळीच्या दिवशी म्हणजेच १३ मार्च रोजी ठामपा मुख्यालयासमोर स्व दहन करण्याचा इशारा दिला आहे.

केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशी १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्याची तजवीज करण्यात आली आहे. त्यानुसार शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ आणि इतर भत्ते वाढले आहेत. तसेच, या वेतनाचा फरक कर्मचाऱ्यांना देण्याबाबत आदेशही देण्यात आलेले आहेत. मात्र, ठाणे महानगर पालिकेकडून हा फरक अद्याप देण्यात आलेला नाही. या संदर्भात म्युनिसिपल कर्मचारी युनियनचे नेते , माजी कार्यकारी अभियंता रवींद्र शिंदे यांनी अनेकवेळा पत्रव्यवहार केला आहे. शिवाय, २६ जानेवारी रोजी पालिका मुख्यालयासमोर आंदोलनाचा इशाराही दिला होता. त्यावेळेस पालिका प्रशासनाने पत्रव्यवहार करून हा फरक देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, अद्यापही ह्या फरकाची रक्कम दिलेली नाही. तसेच, निवृत्त कर्मचाऱ्यांची देणीदेखील पूर्णपणे दिलेली नाहीत. त्या निषेधार्थ म्युनिसिपल कर्मचारी युनियनचे नेते , माजी कार्यकारी अभियंता रवींद्र शिंदे यांनी ज्या दिवशी होळी पेटेल त्याच दिवशी दुपारी आम्ही स्वतःला पालिका मुख्यालयासमोर पेटवून घेऊ, असा इशारा दिला आहे.

दरम्यान, या संदर्भात आपण पालिकेच्या संबधित अधिकाऱ्यांची भेटही घेतली होती. मात्र, योग्य प्रतिसाद मिळत नसल्यानेच आपण हे पाऊल उचलत असल्याचेही शिंदे यांनी सांगितले.

# जपानी अधिकाऱ्यांनी घेतली ठाणे स्मार्ट सिटीच्या प्रकल्पांची माहिती

## जपानी कंपन्यांकडील तंत्रज्ञान सहाय्याबाबत झाली चर्चा



**ठाणे :-** जपान सरकारचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नोमूरा रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थेच्या प्रतिनिधींनी शुक्रवारी ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेडच्या कार्यालयास भेट देऊन प्रकल्पांची माहिती घेतली. विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणी मध्ये येणारी आव्हाने आणि त्यांचा सामना करण्यासाठी जपानी कंपन्यांकडे असलेले तांत्रिक सहाय्य याबाबत या भेटीदरम्यान प्राथमिक चर्चा झाल्याची माहिती ठाणे स्मार्ट सिटी लिचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी दिली. जपानी संस्थेच्या वतीने मुख्य प्रकल्प रचनाकार अया होंडा आणि भारतातील प्रतिनिधी वर्षा गुप्ता यांनी स्मार्ट सिटी प्रकल्पांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळवी यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी, कार्यकारी अभियंता सुधीर गायकवाड, ठाणे स्मार्ट सिटी लि. चे क्षेत्राधारीत विकास प्रकल्प व पॅन सिटी प्रकल्पांचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार उपस्थित होते. ठाणे स्मार्ट सिटी लि. मार्फत राबविण्यात येणारे प्रकल्प वापरण्यात येणारे तंत्रज्ञान तसेच भविष्यात होणारे प्रकल्प, यात जपानमधील कंपन्या तांत्रिक बाबींवर कशाप्रकारे मदत करू शकतात यावर प्रामुख्याने चर्चा झाली.

केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत ठाणे स्मार्ट सिटी लि. मार्फत ठाणे शहरात विविध प्रकल्प राबविण्यात येत आहेत. स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत एकूण ३५ प्रकल्पांपैकी ३२ प्रकल्प पूर्ण झालेले असुन तीन महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.केंद्र शासनाचे गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाचे स्मार्ट सिटी विभाग आणि जपान सरकार यांच्यात सन २०२२ मध्ये सहकार्याचा करार करण्यात आलेला आहे.यानुसार देशातील स्मार्ट सिटी शहरांमध्ये शाश्वत शहरी विकासात सहकार्य पाठविणेसाठी विविध उप गट बनविण्यात आलेले आहेत. याच आधारावर दोन्ही देशांमधील सहकार्य वाढविण्यासाठी जपान इंडिया स्मार्ट सिटी कोऑपरेटीव्ह प्लॅटफॉर्म तयार करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने, सन २०२४-२५ मध्ये दोनदा जपान सरकारचे प्रतिनिधी तसेच संस्थेचे प्रतिनिधी यांच्यासह ऑनलाईन पध्दतीने संवाद झाला होता. तसेच, नोव्हेंबर-२०२४ मध्ये जपान सरकारच्या पायाभूत सुविधा आणि पर्यटन विभागाच्या प्रतिनिधींनी ठाणे स्मार्ट सिटी लि च्या कार्यालयास भेट देऊन प्रकल्पांबाबत माहिती घेतली होती. याच उपक्रमातील पुढील बैठक शुक्रवारी पार पडली.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५

संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# दिवा शिवसेनेच्या वतीने महिला दिनानिमित्त महिला सन्मान कार्यक्रम उत्साहात साजरा




दिवा:- दिव्यात शिवसेना दिवा शहर वतीने जागतिक महिला दिनानिमित्त हळदी कुंकू समारंभ ,होम मिनिस्टर खेळ पैठणीचा व महिलांचा सन्मान आयोजित करण्यात आला.

हा समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला यावेळी दिवा शहरातील महिलांचा सन्मान आयोजकांच्या वतीने करण्यात आला. दरवर्षी ८ मार्च रोजी दिवा शिवसेनेच्या वतीने जागतिक महिला दिन निमित्त महिला सन्मान व हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात येते दिवाशिवसेनेच्या शहर युवती अधिकारी साक्षी मढवी यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम आयोजित केला जातो.






हळदी कुंकू समारंभ,होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे आयोजन









# ठाण्यात उभे राहणार कन्व्हेंक्शन सेंटर

# त्यात असेल २६० मीटर उंचीची प्रेक्षक गॅलरी

## प्रस्तावित प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होतील असे नियोजन करण्याची खासदार श्रीकांत शिंदे यांची सूचना

**ठाणे** :- ठाणे महापालिका क्षेत्रात मोघरपाडा नजीक खाडी किनारी २६० मीटर उंचीची प्रेक्षक गॅलरी उभारण्यात येणार आहे. कन्व्हेंक्शन सेंटर, शॉपिंग मॉल, कार्यालये आदीचा त्या क्षेत्रात विकास होणार आहे. यासारखे शहराच्या दृष्टीने आवश्यक असलेले प्रस्तावित प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होतील असे नियोजन करण्याची सूचना खासदार श्रीकांत शिंदे यांनी केली आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात प्रस्तावित असलेल्या प्रेक्षक गॅलरी आणि कन्व्हेंक्शन सेंटर, कोलशेत येथील टाऊन पार्क, कळव्यातील यशवंत रामा साळवी तरण तलावाची नव्याने बांधणी, खारेगाव येथे प्रस्तावित नवीन नाट्यगृह आदी प्रकल्पांच्या सद्यस्थितीचा आढावा बुधवारी घेण्यात आला. या बैठकीसाठी, खासदार श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, आमदार जितेंद्र आव्हाड, महापालिका आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, माजी नगरसेवक गोपाळ लांडगे, राम रेपाळे, रमाकांत मढवी, नजीब मुल्ला तसेच जिल्हा प्रशासन आणि महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मोघरपाडा येथे २६० मीटर उंचीची प्रेक्षक गॅलरी, कन्व्हेन्शन सेंटर, हॉटेल, गोल्फ कोर्स, मॉल, कार्यालये, कला दालने असा सुमारे ८००० कोटी रुपयांचा प्रकल्प प्रस्तावित आहे. त्यासाठी लागणारी एकूण जागा, त्यापैकी ताब्यातील जागा आदी स्थितीची माहिती आजच्या बैठकीत देण्यात आली. हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे व्यवहार्य झाला पाहिजे. त्याप्रमाणे त्याची आखणी करावी. स्थानिक गरजा काय आहेत, याचा अभ्यास केला जावा, अशी सूचना खासदार श्रीकांत शिंदे यांनी केली. त्याचबरोबर, कोलशेत येथे २२ एकर जागेवर क्रीडा संकुल, मत्स्यालय, सायन्स सेंटर, तारांगण, व्यावसायिक वापराची जागा असे टाऊन पार्क प्रस्तावित आहे. त्यासाठी, ६०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्याचेही सादरीकरण या बैठकीत झाले.तसेच, कळवा येथील यशवंत रामा साळवी तरण तलाव पूर्ण पाडून नव्याने बांधण्यात यावा. त्यात, तलाव, प्रेक्षागृह, इतर खेळांच्या सुविधा आदीची रचना केली जावी. त्याचा विस्तृत आराखडा सादर करावा. कळवा परिसरातील नागरिकांसाठी तिथे उत्तम सुविधा निर्माण झाली पाहिजे, असेही खासदार श्रीकांत शिंदे यांनी स्पष्ट केले. सोबत, खारेगाव येथील नाट्यगृहाच्या आरक्षणाच्या जागेवर छोटेखानी नाट्यगृहासह इतर सुविधा क्रीडा संकुल




याची आखणी करून त्याचा सविस्तर आराखडा करण्याचे निर्देश आजच्या बैठकीत देण्यात आले. या भागात नाट्यगृहाची आवश्यकता असल्याने नाट्यगृह इतर सुविधा लोकांना उपयोगी ठरतील असे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले. त्याचबरोबर, मोठे नाट्यगृह बांधण्यापेक्षा छोटेखानी ३००-३५० प्रेक्षक क्षमतेचे नाट्यगृह बांधल्यास त्याला अधिक प्रतिसाद मिळेल, अशी सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी केले.

याशिवाय मुंब्रा बायपास ते खारेगाव टोल नाका या दीड किलोमीटरच्या पारसिक वॉटर फ्रंट विकास कामाचाही आढावा घेण्यात आला. या कामांमध्ये प्रवेशद्वार आणि सुशोभीकरणाची काही कामे शिल्लक असून ती तातडीने करण्याचे निर्देश खासदार शिंदे यांनी दिले.

# दिव्यात स्वतंत्र पोलीस स्टेशन उभारा - ठाकरे गटाची मागणी

**ठाणे**:- चरस, गांजा, हकीम यासारख्या व्यसनाच्या आधीन येथील तरुण मंडळी जाताना दिसत आहेत. त्यातच महिलांच्या तक्रारी सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. याशिवाय चोरी,दरोडे यासारखे प्रकार दिव्यात सरसपणे होताना दिसत आहेत. पंचवीस हजार लोकसंख्येच्या मागे एक पोलीस अशी दैन्य अवस्था अस्तित्वात असलेल्या दिवा चौकीची असून दिव्यातील लोकांना एफआयआर करायचे असल्यास त्यांना दहा किलोमीटर मुंब्रा पोलीस स्टेशन येथे जावे लागते. त्यामुळे दिव्यात स्वतंत्र पोलीस स्टेशन सुरू करावे, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाने ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात शिवसेना उबाठा पक्षाच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन निवेदन दिले आहे.

दिवा शहर ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत येत असून दिव्याची लोकसंख्या पाच लाखांच्या वर गेली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव येथे मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा चौकी आहे. पण, चौकीत पंचवीस ते तीस लोकांचा अपुरा असा स्टाफ असल्यामुळे दिव्यात गुन्हेगारीचे



प्रमाण वाढले आहे. चरस, गांजा, हकीम यासारख्या व्यसनाला येथील तरुण मंडळी आधीन जाताना दिसत आहेत महिलांच्या तक्रारी सुद्धा भरपूर प्रमाणात आहेत. चोरी, दरोडे यासारखे प्रकार दिव्यात सरसपणे होताना दिसत आहेत. पंचवीस हजार लोकसंख्येच्या मागे एक पोलीस अशी दैन्य अवस्था दिवा चौकीचे असून दिव्यातील लोकांना ईंद करायचे असल्यास त्यांना दहा किलोमीटर मुंब्रा पोलीस स्टेशन येथे जावे लागते त्यामुळे येथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दिवावासी गेले कित्येक वर्ष दिवा पोलीस स्टेशन व्हावे म्हणून आम्ही वारंवार मागणी करत आहोत परंतु जागेचा अभाव सांगून ही मागणी वारंवार पुढे ढकलण्यात येत आहे, तरी आपण ठाणे महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी ठाणे यांच्या बरोबर चर्चा करून दिवा विभागातील सरकारी जागा आपण पोलीस स्टेशन साठी मागणी करावी व तेथे तात्काळ दिव्यासाठी सुसज्ज असे पोलीस स्टेशन करावे अशी मागणी निवेदनाद्वारे शिवसेना उबाठा पक्षाने केली आहे. कल्याण जिल्हा प्रमुख दीपेश म्हात्रे यांच्या नेतृत्वात दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी ठाणे पोलीस आयुक्तांना निवेदन दिले असून यावेळी उपजिल्हाप्रमुख राहुल भगत, विजय देसाई, शहर प्रमुख सचिन पाटील, प्रकाश तेलगोटे, विजय कदम, लहू चाळके, रवींद्र सुर्वे, कलवा शहर संघटिका कल्पना कवले, मुंब्रा शहर संघटिका शाहीन घडीआली, उपशहर प्रमुख अनिश कुरेशी आदी उपस्थित होते.

# कोटयवधींच्या पूर्ण रस्त्याची पुन्हा निविदा; महापालिका अधिकाऱ्याला बडतर्फ करा

### संजय वाघुले यांची महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्याकडे मागणी

**ठाणे** : -उथळसर प्रभाग समितीत दोन ते तीन वर्षांपूर्वी पूर्ण झालेल्या कॉंक्रिट रस्त्यांच्या कामाची पुन्हा निविदा काढून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या महापालिका अधिकाऱ्याला बडतर्फ करावे. तसेच संबंधित निविदा तातडीने रद्द करावी, अशी मागणी भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

धोबी आळी, चरई, दगडी शाळा परिसर, खारकर आळी, महागिरी, गवळी पाडा, खान चाळ, कडवा गल्ली, जोगिला मार्केट, उथळसर, मनोरपाडा, सामंतवाडी, आंबेडकर रोड, लॉरी स्टॅण्ड, पिंपळपाडा, भोईर चाळ आदी भागांमध्ये सध्या कॉंक्रीट रस्ते तयार करण्यात आलेले आहेत. या भागातील रस्त्यांची कामे सुमारे दोन ते तीन वर्षांपूर्वी करण्यात आली असून, सध्या या भागातील रस्ते सुस्थितीत आहेत. तसेच त्यांची बिलेही संबंधित कंत्राटदारांना अदा करण्यात आलेली आहेत. मात्र, या भागातील रस्त्यांची यूटीडब्ल्यूटी पद्धतीने कॉंक्रिटीकरण करण्याच्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. पूर्ण झालेल्या कामांची पुन्हा निविदा काढून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करण्याचा महापालिकेतील काही अधिकाऱ्यांचा डाव आहे, असा आरोप भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी केला. ठाणे महापालिकेच्या तिजोरीत निधीची आर्थिक चणचण असतानाही, ४ मार्च रोजी संबंधित रस्त्यांच्या कामाची पुन्हा निविदा जारी करण्यात आली. या कामासाठी १२ मार्चपर्यंत ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या आहेत. या कामासाठी पाच कोटी रुपयांची तरतूद आहे. या प्रकाराची आपण गंभीर दखल घेऊन चौकशी करावी. तसेच या चौकशीनंतर निविदा जारी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर बडतर्फीची कारवाई करावी. या कारवाईमुळे पुन्हा असा प्रकार करण्यास कोणीही अधिकारी धजावणार नाही, अशी मागणी भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी केली आहे.

# आरएसएसचे भय्याजी जोशींच्या विरोधात ठाण्यात शिवसेनेची सह्यांची मोहीम

**ठाणे:** -घाटकोपरची भाषा गुजराती आहे. मुंबईत राहणार्या प्रत्येकाला मराठी भाषा बोलता आली पाहिजे असे नाही, अशी मुक्ताफळे उधळणारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते भय्याजी जोशी यांचा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने शुक्रवारी ठाण्यात निषेध करण्यात आला. जोशी यांच्यावर कारवाई करण्यासाठी ठाणे स्टेशन परिसरात सह्यांची मोहीम राबवत तीव्र निदर्शने करण्यात आली.




तसेच छत्रपती शिवाजी महाराजांबाबत वादग्रस्त विधान करणारे प्रशांत कोरटकर आणि राहुल सोलापूरकर यांना अटक करण्याची मागणीही यावेळी संतप्त शिवसैनिकांनी राज्य सरकारकडे केली. या आंदोलनात ठाणेकर मराठी माणसाने उत्स्फुर्दपणे सहभाग घेत भय्याजी जोशींचा निषेध नोंदवला.

त्यावेळी शिवसेना नेते माजी खासदार राजन विचारे ,ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे, शहर प्रमुख प्रदीप शिंदे ,उपजिल्हाप्रमुख कृष्णकुमार कोळी , उपशहर प्रमुख सचिन चव्हाण,संजय ब्रीद ,उपशहर प्रमुख वसंत गव्हाळे,विभाग प्रमुख प्रकाश पायरे प्रतीक राणे,प्रशान्त सातपुते ,माया पाटील ,अरविंद भोईर ,जिवाजी कदम ,गिरीश राजे ,राजेंद्र महाडिक माजी नगरसेवक संजय दळवी ,अमोल हिंगे, बिपीन गेहलोत ,सुशांत घोलप ,दत्ता पागवले ,राजेश जाधव,प्रदीप शेडगे ,राम काळे,संजय भोई,राजेश वायाळ ,माजी नगरसेविका नंदिनी विचारे

उपजिल्हा संघटिका आकांक्षा राणे , शहर संघटिका वैशाली शिंदे, प्रमिला भांगे ,मंजिरी धमाले, कांता पाटील,अपर्णा भोईर ,रसिका सुभेदार ,देशपांडे काकूव इतर पुरुष व महिला व युवासेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# ठामपाच्या यंदाच्या अर्थसंकल्पात धर्मवीर आनंद दिघे यांच्या स्मारकाचा उल्लेख नसल्याने केदार दिघे यांच्याकडून संताप

**ठाणे:**- ठाणे महानगरपालिकेच्या यंदाच्या अर्थसंकल्पात धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या स्मारकाचा उल्लेख नसल्याने शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांनी महापालिका आणि शिंदे गटाच्या कारभारावर संताप व्यक्त केला आहे. निवडणुकांवेळी दिघे साहेबांच्या स्मारकाची घोषणा करणारे निवडणुका झाल्यावर मात्र दिघे साहेबांच्या स्मारकाचा विषय गुंडाळतात याबाबत केदार दिघे यांनी ट्विट करून संताप व्यक्त केला आहे.

**निवडणुकांवेळी फक्त मतांसाठी दिघे साहेबांच्या नावाचा वापर होत असल्याचा आरोप**

आपल्या ट्विटमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांनी म्हटले आहे की,धर्मवीर गुरुवर्य आनंद दिघे साहेब यांच्या स्मारकाचा विसर ठाणे महानगरपालिकेला पडला असून यंदाच्या अर्थसंकल्पात त्यासाठीची तरतूद नाही.आधी स्मारकाची घोषणा करून मतांसाठी दिघे साहेबांचा वापर करणारे नकली लोकं जनतेसमोर उघडे पडत आहेत... खरंतर दिघे साहेबांची दैवी शक्ती येणाऱ्या काळात या नाटकी लोकांचा मुखवटा फाडल्याशिवाय राहणार नाही असा इशाराही केदार दिघे यांनी या सोशल मीडिया पोस्ट च्या माध्यमातून दिला आहे. धर्मवीर आनंद दिघे यांचा निवडणुकांच्या वेळी होणारा मतांसाठीचा वापर याबाबत केदार दिघे यांनी संताप व्यक्त केला असून महापालिकेने धर्मवीर आनंद दिघे यांचे भव्य दिव्य स्मारक उभारावे अशी मागणी केदार दिघे यांनी केली आहे.

# ठाणे परिवहन सेवेतील महिला वाहक स्वप्नगंधा घाटे यांच्या कार्याचा दिल्लीत सन्मान




**ठाणे :**- ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या महिला वाहक स्वप्नगंधा घाटे यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल नवी दिल्ली, या संस्थेने त्यांचा शनिवारी सन्मान केला. माजी आयपीएस अधिकारी किरण बेदी यांच्या हस्ते स्वप्नगंधा घाटे यांना सन्मानित करण्यात आले.

महिला वाहक स्वप्नगंधा स्वप्नील घाटे ( ३८) वाहक क्रमांक २००६ या सन २०२० पासून वाहन वाहक या पदावर ठाणे परिवहन सेवेत कार्यरत आहेत. ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाने नियुक्त केलेले कत्रांटदार मे. अपुर्वा महिला सामाजिक संस्थेच्या माध्यमातून त्या परिवहन सेवेत काम करत आहेत. स्वप्नगंधा घाटे यांनी आजपर्यंत अत्यंत प्रामाणिक व निष्कलंक सेवा ठाणेकर नागरिकांना देत आहेत.

स्वप्नगंधा घाटे यांच्या कार्यसन्मानामुळे ठाणे महानगरपालिकेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे व ठाणे परिवहन सेवेचे नाव देशपातळीवर पोहचले आहे. स्वप्नगंधा घाटे यांचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी देखील कौतुक करून अभिनंदन केले आहे.

# जगातील सर्वात उंच स्वतंत्र पर्वत माउंट किलीमांजारोवर ठाणेकर अमोल चव्हाण यांची चढाई




**ठाणे :** - येथील अमोल सुभाष चव्हाण यांनी जगातील सर्वात उंच स्वतंत्र पर्वत आणि आफ्रिकेतील सर्वोच्च शिखर माउंट किलिमांजारो (१९,३४० फूट) यशस्वीरित्या शनिवारी १ मार्च रोजी २०२५ रोजी सर करून महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. ठरूफ ऑफ आफ्रिकाठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माउंट किलिमांजारो वर त्यांनी चढाई करून तिरंगा फडकावला व एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे.

अमोल यांनी ऑक्टोबर २०२४ मध्ये एव्हरेस्ट बेस कॅम्प सर केले होते. गेल्या वर्षभरापासून ते माउंट किलिमांजारो आणि एव्हरेस्ट बेस कॅम्प मोहिमेची तयारी करत होते आणि त्याची पूर्व तयारी म्हणून त्यांनी टाटा मुंबई मॅरेथॉन २०२५ ची ४२ किलोमीटर मॅरेथॉन देखील ५ तास १६ मिनिटांत पूर्ण केली.

अमोल यांना साहसी खेळांची विशेष आवड आहे. त्यांनी सह्याद्री, काश्मीर आणि उत्तराखंडमधील ७० हून अधिक ट्रेकिंग मोहिमा यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत. स्काय डायव्हिंग, स्कूबा डायव्हिंग आणि बंजी जम्पिंग यांसारख्या साहसी खेळांचा अनुभवही त्यांनी घेतला आहे. अमोल यांनी आतापर्यंत ४ खंडांतील १२ देशांना भेटी दिल्या आहेत. त्यांच्या या यशस्वी प्रवासात कठोर परिश्रम आणि जिद्दीला त्यांनी श्रेय दिले आहे. अमोल यांच्या पत्नी आणि कुटुंबातील सदस्यांनी त्यांना नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. त्यांच्या या यशात त्यांच्या कुटुंबाचा मोठा वाटा आहे. गेली १६ वर्षे मुंबईत वास्तव्य करणारे अमोल हे उच्चशिक्षित एमबीए असून सध्या ठाण्यात राहतात. ते एसीजी वर्ल्ड कंपनी मध्ये मार्केटिंग मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत. अमोल हे नाशिकचे सेवानिवृत्त शिक्षक सुभाष काशिनाथ चव्हाण यांचे सुपुत्र आहेत. अमोल यांच्या या अतुलनीय कामगिरीमुळे महाराष्ट्र आणि भारताचे नाव जागतिक स्तरावर उंचावले आहे. त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ठाण्याच्या कॅडबरी उड्डाणपुलावर डंपरची जोरदार दोन वाहनांना धडक ; अपघातात कारचा चक्काचूर

**ठाणे:** मुंबई - नाशिक वाहिनीवरील कॅडबरी उड्डाणपुलावरील उतरणीवर वाहतूक कोंडी असल्याने वाहने थांबली होती. याचदरम्यान भरधाव वेगाने आलेल्या डंपरने मागून ट्रक आणि चारचाकी ' पंच ' या कारला जोरदार धडक दिली. या अपघातात चारचाकी कारमधील जावळे आणि बागुल या दोन कुटुंबातील सहा जण अडकल्याची घटना रविवारी मध्यरात्री सव्वा एक ते दीड वाजण्याच्या सुमारास समोर आली. त्या सहा जणांना सुखरूप बाहेर काढून बेथनी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. जखमींमध्ये तीन जण लहान मुलांचा समावेश असून उपचारानंतर चौघांना घरी सोडण्यात आले तर मायलेकींवर रुग्णालयात उपचार सुरू आहे. तसेच या अपघाताने त्या मार्गावर तब्बल तासभर वाहतूक कोंडी झाली होती. हा अपघात इतर भीषण होता की, त्या चारचाकी कारचा अक्षरशः चक्काचूर झाला असून डंपरचालक या अपघातानंतर तेथून फरार झाला आहे. अशी माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली. फरार डंपर चालक हा मुलुंड चेक नाका येथून कशेळी माती डम्पिंग येथे माती घेऊन निघाला होता. याचदरम्यान मुंबई नाशिक वाहिनीवरील कॅडबरी उड्डाणपुलावर वाहतूक कोंडी असल्याने गाड्या थांबल्या होता. मात्र भरधाव वेगाने निघालेल्या चालकाचा डंपरवरील ताबा सुटला आणि तो कार आणि ट्रक जाऊन धडकला.

# ठाणे महानगरपालिकेच्या विद्यापीठासाठी आरक्षित असलेल्या भूखंडाचा गैरवापर

**ठाणे महानगरपालिकेला भूखंडाचा पडला विसर**

## ठाण्यात विद्यापीठासाठी राखीव भूखंडाचा गैरवापर; मनसेची कारवाईची मागणी

### यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर प्रदर्शनाचे आयोजन

**ठाणे** :- यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठासाठी ठाणे महानगरपालिकेने आरक्षित केलेला भूखंड शिक्षणाच्या उद्देशाने वापरण्याऐवजी अन्य व्यावसायिक उपक्रमांसाठी वापरला जात असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जनहित व विधी विभाग ठाणे शहर अध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर यांनी केला आहे. या भूखंडावर कपडे आणि घरगुती वस्तूंच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याने, हा थेट भूखंडाच्या उद्देशाविरुद्धचा गैरवापर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या प्रशासनाने पोखरण क्रमांक २, हिरानंदानीजवळील निहारिका संकुलाजवळ असलेला भूखंड यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाला कवडीमोल भावात भाडेतत्त्वावर दिला होता. ठाणे शहरात विद्यापीठाचे केंद्र नसल्याने, स्थानिक विद्यार्थ्यांना मुंबई किंवा अन्य ठिकाणी जाण्याची गरज भासू नये, हा मुख्य उद्देश होता. या भूखंडावर विद्यापीठाची स्थापना करून ठाण्यातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याचा महानगरपालिकेचा हेतू होता. गेल्या दहा वर्षांपासून हा भूखंड रिकामा होता, मात्र आता विद्यापीठ स्थापनेसाठी देण्यात आलेल्या जागेचा वापर व्यवसायिक कारणांसाठी केला जात आहे. या भूखंडावर विद्यापीठाऐवजी कपडे आणि घरगुती वस्तूंचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. हे प्रदर्शन भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आले असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर तात्पुरते बांधकामही करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या परवानगीशिवाय या भूखंडावर कोणत्याही प्रकारचे व्यावसायिक उपक्रम किंवा प्रदर्शन भरवण्यास सक्त मनाई करण्यात आली होती. मुख्य प्रवेशद्वार एकच असल्याने, आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन यंत्रणांना घटनास्थळी पोहोचण्यात अडथळा निर्माण होऊ शकतो.

त्यामुळे यापूर्वी प्रदर्शन भरवण्यास परवानगी नाकारण्यात आली होती. मात्र, यंदा महानगरपालिकेने प्रदर्शनाला संमती दिली असून भूखंडाचा उद्देशाविरुद्ध गैरवापर सुरू असल्याचे मनसेने आरोप केले आहेत. या संदर्भात २०१५ साली देखील बेकायदेशीर प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते, त्यावेळी




महापालिकेने कारवाई केली होती. मात्र, यंदा परवानगी मिळाल्याने, भूखंडाचा व्यावसायिक गैरवापर होत असल्याचे चित्र आहे. या भूखंडाचा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या वतीने गैरवापर केला जात असून हा भूखंड विद्यापीठ स्थापन करण्यासाठी देण्यात आला आहे व संबंधित संस्थेला विद्यापीठ स्थापन करता येत नसेल तर हा भूखंड महानगरपालिकेच्या वतीने विद्यापीठाच्या संस्थेकडून परत घेण्यात यावा व भूखंडधारकावर बेकायदेशीर प्रदर्शन भरवल्या संदर्भात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आयुक्तांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

स्वप्निल महिंद्रकर, ठाणे शहर अध्यक्ष
मनसे जनहित व विधी विभाग

# बेटी बचाओ, बेटी पढाओ उपक्रमांतर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून भव्य प्रभातफेरीचे आयोजन

**ठाणे** : बेटी बचाओ, बेटी पढाओ या उपक्रमाला यावर्षी १० वर्षे पूर्ण झाली आहेत व त्यानिमित्त बालक व महिला यांचे कायदे व अधिकार, मुलींच्या शिक्षणाचे महत्व याबाबत जनजागृती करण्याकरिता महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे एस.बी. अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव ईश्वर सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली आज जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे व ठाणे येथील विधी महाविद्यालये यांच्या संयुक्त विद्यमाने बेटी बचाओ, बेटी पढाओ उपक्रमांतर्गत जिल्हा न्यायालय, ठाणे परिसरात भव्य जनजागृती प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले.

रॅलीच्या उद्घाटनाप्रसंगी जिल्हा न्यायाधीश व्ही. एल. भोसले, मोटार अपघात दावा न्यायाधीकरण, ठाणेच्या सदस्य एस एन शाह, मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे एस के फोकमारे, ७वे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर, ठाणे ए.सी डोईफोडे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव ईश्वर सूर्यवंशी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संतोष भोसले यांनी रॅलीमधील उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यानंतर एस.ई.एस. दयाल आशा विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जनजागृतीवर आधारीत सुंदर असा पोवाडा गायल्यानंतर मान्यवरांतर्फे हिरवा झेंडा दाखवून या रॅलीला सुरूवात करण्यात आली.

या रॅलीमध्ये विद्या प्रसारक मंडळाचे टी.एम.सी. विधी महाविद्यालय, आनंद विश्व गुरुकुल विधी महाविद्यालय, शेठ एन के टी. कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड सायन्स, एस.ई.एस. दयाल आशा विधी माविद्यालय नगर व जिजाऊ शैक्षणिक सामाजिक संस्था, ठाणेनगर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, जिल्हा महिला व बाल विकास, ठाणेचे प्रतिनिधी, आशा वर्कर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणेचे कर्मचारी, लिगल एड डिफेन्स कौन्सील सिस्टीमचे सर्व विधीज्ञ यांनी सहभाग घेतला होता. रॅलीमध्ये विद्या प्रसारक मंडळाचे टी.एम.सी. विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुंदर पथनाट्य सादर करून त्याद्वारे बेटी बचाओ, बेटी पढाओ या उपक्रमाविषयी जनजागृती करण्यात आली.

ही प्रभात फेरी जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे पासून कोर्ट नाका सर्कल-जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे समोरून जांभळी नाका चौकातून तलावपाळी सिग्नलपर्यंत-नंतर तलावपाळी सिग्नल पासुन चितामणी ज्वेलर्स-टेंभीनाका-जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे या मार्गे काढण्यात आली. या प्रभात फेरीमध्ये एकूण ४०० सदस्यांनी भाग घेतला या प्रभात फेरीमध्ये झ्ण्झ्ऊ, झ्ध्ण्ए्ध् तसेच महिलाबाबतचे इतर कायदे, अधिकार यावर सर्व मान्यवरांतर्फे प्रकाशझोत टाकण्यात आला. हे अभियान केवळ एक दिवसापर्यंत मर्यादित न ठेवता समाजातील प्रत्येक घटकाची महिला व बालकांबाबतची मानसिकता बदलण्यासाठी सर्वांनी सातत्याने प्रयत्न करावे, असे आवाहन ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव ईश्वर सूर्यवंशी यांनी केले.

या प्रभात फेरीमध्ये जिल्हा न्यायाधीश व्ही. एल. भोसले, मोटार अपघात दावा न्यायाधीकरण, ठाणे सदस्य एस.एन. शाह, मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे एस के फोकमारे, ७वे सह दिवाणी न्यायाधीश, व स्तर, ठाणे ए.सी डोईफोडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार, जिल्हा दंत चिकित्सक डॉ. अर्चना पवार, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संतोष भोसले, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव ईश्वर सूर्यवंशी, व इतर न्यायिक अधिकारी, सहायक सरकारी अभियोक्ता संजय मोरे, जेष्ठ विधीज्ञ ॲड.राजेंद्र नलगे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.संजय म्हात्रे तसेच इतर शासकीय विभागातील कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होवून रॅली यशस्वीपणे संपन्न केली.

# नववर्ष स्वागतयात्रेच्या स्वागताध्यक्षपदी टीजेएसबीचे शरद गांगल

**ठाणे**:-श्री कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यास आयोजित यंदाच्या रौप्य महोत्सवी वर्षातील हिंदु नववर्ष स्वागतयात्रेचे स्वागताध्यक्ष म्हणून टीजेएसबी सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. सोमवारी श्री कौपिनेश्वर मंदिर सभागृहात आयोजित बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

श्री कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यासच्या वतीने हिंदु नववर्षा निमित्त ३० मार्च रोजी स्वागतयात्रा काढण्यात येणार आहे. स्वागतयात्रेचे यंदाचे २५ वे वर्ष असल्याने या स्वागतयात्रेला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. यात्रेच्या नियोजनासाठी सोमवारी (दि.०३ मार्च) पार पडलेल्या बैठकीत टीजेएसबीचे शरद गांगल यांची स्वागताध्यक्ष म्हणुन घोषणा करण्यात आली. या बैठकीला न्यासाचे अध्यक्ष उत्तम जोशी, कार्याध्यक्ष संजीव ब्रह्मे, कार्यवाह डॉ.अश्विनी बापट, निमंत्रक तनय दांडेकर, पितांबरीचे रविंद्र प्रभुदेसाई, सुहृदयी उद्योजक एसएमसीचे सुहास मेहता आदिसह विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सर्वांनी गांगल यांचे अभिनंदन केले.

अभाविपचे कार्यकर्ते व संघ स्वयंसेवक असलेले शरद गांगल हे सध्या टीजेएसबी बँकेचे अध्यक्ष आहेत. त्याचबरोबर सेवा सहयोगच्या विद्यार्थी साहाय्य योजनेचे दायित्व, सहकार भारती प्रांत पदाधिकारी तसेच अनेक सामाजिक संस्थांच्या कामात त्यांचा सहभाग आहे. ते मानव संसाधन (एचआर) क्षेत्रातले तज्ज्ञ आहेत.

त्यांनी थरमॅक्स कंपीनीत कार्यकारी संचालक, एचडीएफसी स्टँडर्ड लाईफ इन्शुरन्सचे महाव्यवस्थापक तसेच कॅडबरी, एशियन पेन्ट अशा कंपन्यांमध्ये महत्त्वाची पदे भूषविली आहेत. राष्ट्रीय सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश सदस्य आणि सिंबायोसिस या शैक्षणिक संस्थेच्या शैक्षणिक परिषदेशी संलग्न आहेत.

# झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरावर यापुढे पति-पत्नी यांच्या संयुक्त नावाची होणार नोंद

### मुंबई महानगरप्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा महत्वाचा निर्णय

**ठाणे** :- महिलांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी आणि त्यांना त्यांच्या पतीच्या मालमत्तेवर अधिकार देण्यासाठी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने (एमएमआर-एसआरए) महिला दिनानिमित्त एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. ज्यामध्ये भारतीय संस्कृतीत पती-पत्नी हे एकत्रित आणि एक घटक मानले जातात आणि त्यांची मालमत्ता दोघांचीही सामायिक मालमत्ता मानली जाते. त्यामुळे महिलांचा स्वाभिमान वाढविण्यासाठी त्यांचे निवासी घर पती-पत्नी दोघांच्याही नावाने नोंदणीकृत केले जाईल.

अनेकदा, पतीच्या मृत्यूनंतर, महिलांना पतीच्या मालमत्तेवर हक्क सांगण्यासाठी कायदेशीर अडचणींना तोंड द्यावे लागते. जर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या परिशिष्ट-मध्ये पती-पत्नीचे हक्क आधीच असतील तर अशा समस्या उद्भवणार नाहीत. त्यामुळे, पुनर्विकासानंतर मिळालेल्या घराची नोंदणी पती-पत्नीच्या संयुक्त नावाने करणे बंधनकारक असेल, असा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे.

झोपडपट्टी भागात राहणाऱ्या महिलांच्या सक्षमीकरणासाठी मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, आता पुनर्विकासाअंतर्गत मिळालेली घरे पती-पत्नीच्या संयुक्त नावाने नोंदणीकृत केली जाणार आहे. प्राधिकरणाने या संदर्भात एक परिपत्रक जारी केले आहे आणि मुंबई महानगर प्रदेशातील झोपडपट्टीवासीयांसाठी हा निर्णय लागू करण्यात आला आहे.

प्राधिकरणाच्या नवीन सूचनांनुसार, सक्षम प्राधिकरणाकडून योजनेचे परिशिष्ट-जारी करताना घर वाटप पत्रावर पती-पत्नी दोघांचीही नावे नोंदविणे बंधनकारक केले आहे. याव्यतिरिक्त, सहकारी संस्थांच्या सहाय्यक निबंधकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांना फ्लॅट वाटप करताना पती-पत्नीचे नाव ठसंयुक्त सदस्यठ म्हणून प्रविष्ट करणे आवश्यक आहे.

या निर्णयामुळे झोपडपट्टीत राहणाऱ्या महिलांना त्यांचे हक्क मिळतील आणि त्यांना कोणत्याही कायदेशीर अडचणींना तोंड द्यावे लागणार नाही. - पराग सोमण, सीईओ, (एमएमआर-एसआरए ठाणे)

# ठाण्याच्या येऊरमध्ये बिबट्याचे दर्शन

**ठाणे:** येऊर गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरून दोन बिबटे जात असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे. हा प्रकार गुरुवारी पहाटे साडेतीन ते पावणेचार वाजण्याच्या दरम्यानचा आहे. निसर्गरम्य असलेल्या येऊरमध्ये गेल्या काही वर्षांपासून मॉर्निंग वॉकला जाण्याची संख्या अधिक असल्याने आता ठाणे वनविभागाची याबाबत जनजागृतीसाठी धावपळ सुरू झाली आहे. तसेच येऊर वन परिक्षेत्रात बिबट्यांचा अधिवास मोठ्या प्रमाणात आहे. मात्र मध्यंतरी बिबट्याचे दर्शन होत नव्हते. त्यातच अचानक एक नाहीतर दोन बिबट्याचे दर्शनाने झाल्याने त्यांचा अधिवास अजूनही येऊर जंगलात कायम असल्याचे दिसत आहे.

# ध्वनी प्रदूषण तसेच अनधिकृत मंडपाबाबत तक्रारींसाठी महापालिकेची हेल्पलाईन

### नागरिकांना संपर्क साधण्याचे आवाहन

**ठाणे** :- उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, ठाणे महापालिका क्षेत्रातील ध्वनी प्रदूषण तसेच अनधिकृत किंवा अनियमित मंडप रचना यांच्याबाबत नागरिकांना तक्रार नोंदवता यावी यासाठी तक्रार निवारण प्रणाली तयार करण्यात आली आहे.

नागरिकांनी ध्वनी प्रदूषणविषयक तसेच, अनधिकृत किंवा अनियमित मंडप रचनांबाबत पुढील क्रमांक किंवा इमेलवर तक्रार करावी, असे आवाहन ठाणे महापालिकेने केले आहे.

**तक्रार करण्यासाठी टोल फ्री नंबर - १८०० २२२ १०८**
**एसएमएस आणि व्हॉट्सअप सुविधा - ७५००९४६९५**
**दूरध्वनी क्रमांक -०२२-२५३७१०१०**
**तरी नागरिकांनी या तक्रार प्रणालीचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

SHWAAS
ACE NX HOSPITAL & RESEARCH CENTRE
Superspeciality Hospital
Our Passion Your Care

२५,००० ते २,००,००० पर्यंत विमा योजना



मुख्यमंत्री सहायता निधी | CM Relief Fund

फुफ्फुस प्रत्यारोपण
हिप रिप्लेसमेंट
अपघात शस्त्रक्रिया
कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन)
लहान बालकांचे शस्त्रक्रिया
अपघात
हृदयरोग
डायलिसिस
हाताचे प्रत्यारोपण
गुडघ्यांचे प्रत्यारोपण
विद्युत अपघात रुग्ण
नवजात शिशुंचे आजार
बर्न रुग्ण
मेंदूचे आजार
कर्करोग शस्त्रक्रिया

Address
Mahavir height, Golul Nagari, opp. Mumbai University, Wayle Nagar, Khadakpada, Kalyan, Maharashtra- 421301

Emergency
7777008464
9076229076







# ज्योती पाटील यांच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दिव्यातील महिलांचा सन्मान

**दिवा:**-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व तन्वी फाउंडेशन दिवा यांच्या संयुक्त विद्यमाने बी आर नगर येथे महिला दिनाचे औचित्य साधून सन्मान कर्तृत्वाचा, सन्मान दिव्यातील महिलांचा या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी दिवा शहरातील सर्वसामान्य कुटुंबातील महिलांचा आयोजकांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

या अनोख्या कार्यक्रमाला दिवा शहरातील शेकडो महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे, जिल्हा संघटिका वैशाली दरेकर, दिवा शहर प्रमुख सचिन पाटील, दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.











